# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ३०/०५/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

### दरोडा

**पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील बाबुलखेडा शेतशिवारातील कॅनॉल जवळील फिर्यादीचे शेतातील घर येथे दिनांक २९/०५/२०२२ चे २२.३० वा. ते २३.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– सौ शुभांगी अनिल मोहबे वय ५१ वर्ष, रा. प्लाट नं ३२, बुटी ले–आउट राजनगर, नागपुर यांचे शेतातील घरामध्ये शेतकामासाठी ठेवलेल्या शेतगडयास तोंडाला रूमाल बांधलेले ८ अज्ञात आरोपीतांनी घरात शिरून चाकुचा धाक दाखवुन हाणमार करून तसेच हात बांधुन तळ घर कोठे आहे असे विचारून घरातील साहीत्याची फेकफाक करून घराचे हॉलमधिल टाईल्स खणुन तसेच घरामध्ये लागलेल्या कॅमेऱ्याची तोडफोड करून नुकसान केले. तसेच घरामध्ये असणारा ०१ वायफाय कॅमेरा किंमती ४,८००/–रू. व १ टॉर्च किंमती ३००/–रू. असा एकुण ५,१००/–चे साहीत्य चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३९५, ४२७, ३२३, ४५७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री दिपक कॉक्रेडवार मो.क्र. ८३२९६६६६७८ हे करीत आहे.

### घरफोडी

**१) पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील भानेगाव वार्ड नं ०३ येथे दिनांक २९.०५.२२ चे १६.३० ते १८.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– प्रदिप विनायक कावळे, वय ३७ वर्ष, रा. वार्ड नं ३, उपासे लेआउट ता सावनेर हे पावर प्लॉट खापरखेडा येथे नोकरी करीत असुन फिर्यादीची आई हि काही दिवसापुर्वी घर कोराडी येथे गेली होती. फिर्यादी हे आपले डयुटीवर गेले असतांनी अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे कुलुप व कोंडा तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने बेडरूम मध्ये असलेले लोखंडी आलमारीमधील स्टिलचे डब्यात ठेवलेले सोन्या–चांदीचे दागीने एकुण कि. ४०,९००/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री किशोर धापाडे मो.क्र. ९९२३०४७०७९ हे करीत आहे.

२) **पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील अर्जून नगर मौदा येथे दिनांक २९.०५.२०२२ चे ०३:०० वा. ते ०३:३० वा. सुमारास फिर्यादी नामे– सौ. शिवानी संदिपकुमार सैनी, वय २५ वर्षे रा. मावा ता. अनंतसाहेब, जि.रोपनगर राज्य. पंजाब ह.मु. ग्रानीराम मालाधारी याचे घरी किरायाने अर्जून नगर, मौदा ता. मौदा यांचे घराचे गॅलरीचे खिडकीच्या आत अज्ञात आरोपीने हात घालून फिर्यादीचे घराचा दरवाजा काढला व घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने घरातील पर्स मधून सोन्याची बाली कि. ८,०००/–रु., चांदीच्या ३ अंगठया किं. १,२००/–रु. तसेच नगदी १,२००/–रु. असा एकुण कि. १०,४००/–रु. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार मेश्राम ९८२२५४५१६९ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत २० कि.मी. अंतरावरील मौजा शिवनी शेत शिवार येथे दिनांक २९.५.२०२२ चे १२.०० वा. सुमारास आरोपी नामे– आशुतोष भोंडे(मृतक), वय १९ वर्ष, रा. डोगरगांव ता.कुही हा आपला एमएच–४०/एके– ७१२४ क्रमांकाच्या टिप्परमध्ये मुरूम घेवुन शेतात आला असता त्याच्या ताब्यातील वाहन हे रिव्हर्स घेत असतांना टिप्पर भरून मुरूम खाली करीत असतांना त्याचे ड्रॉयव्हर साईडचा भाग उलटल्याने त्याचे डोके कॅबिन व जमिनीच्या मध्ये फसल्याने तो स्वतः चे मरणास कारणीभूत ठरला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा गौतम मेश्राम यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम ३०४ (अ) भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री चौधरी ७०३८८२२०५ हे करीत आहे.

## सर्पदंशामुळे मृत्यु

**पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत १ कि. मी. अंतरावरील मौजा ब्राम्हणी फाटा येथे दिनांक २९/०५/२०२२ चे ११. ०० वा. दरम्यान फिर्यादीचा लाहान भाऊ **सनी शिवजी यादव (मृतक), वय १५ वर्षे रा. वार्ड नं. १२ कळमेश्वर** हा झुनका भाकर केन्द्राचा किचन मध्ये उभा असता त्याचा डावा पायाचे अंगठाला एकाऐकी सापाने चावा घेतला. त्याची प्रकृती खराब झाल्याने त्यास सरकारी दवाखाना कळमेश्वर येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– ओमकार शिवजी यादव, वय २८ वर्षे रा. वार्ड नं. १२ कळमेश्वर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार राजेन्द्र पाली मोक्र. ९२८४३५४६३० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**